पनवेल (प्रतिनिधी) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवारी सुधागड एज्युकेशनच्या केवाळे येथील शाळेच्या वर्गखोल्यांचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर व तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, तुकाराम पाटील, अण्णा पालकर, महिला कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, उपाध्यक्षा समीना साठी, ज्योती रायबोले, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवा नेते विलास फडके, उदित नाईक, महेंद्र माळी, हॅप्पी सिंग, गुरूनाथ भोपी, सुनिल पाटील, बाळाराम उसाटकर, महादेव गडगे, मोतीराम गायकर, शंकर डांगरकर, भगवान माळी, राज पाटील, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, प्रत्येक गावाला पायाभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी आपण नेहमी आग्रही राहून काम केले आहे. मला विकासकामे करता आली ती कार्यकर्ते आणि नागरिकांच्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहेत. आज माझ्या सोबतीने माळीण गावाच्या मदतीसाठी विविध संस्था व कार्यकर्त्यांनी सढळ हाताने मदत केली असून खऱ्या अर्थाने सामाजिक जाणीव ठेवून कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे, असेही ते म्हणाले.